Vol III Issue VIII Feb 2014

Impact Factor : 2.2052(UIF)

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 2.2052**(UIF)

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-3 | Issue-8 | Feb-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# मनोविकृतींच्या उपचारार्थ मानसशास्त्रीय समुपदेशनाचे महत्व

**गणेश विष्णू लोखंडे**

मानसशास्त्र विभागप्रमुख
आर.बी.एन.बी. कॉलेज, श्रीरामपूर जि. अहमदनगर.

***सारांश*** **:-**मानसशास्त्र मानवी वर्तनाचा व मानसिक प्रक्रियांचा अभ्यास करते. मानवी वर्तनात इष्ट दिशेने बदल करण्यासाठी, मानव व मानवी समाजाच्या विकासासाठी, कल्याणासाठी मानसशास्त्र व मानसशास्त्रज्ञ सतत कार्यमग्न आहेत. मानवाची म्हणून जी काय क्षेत्र आहेत त्या त्या ठिकाणी मानसशास्त्रज्ञ कार्य करीत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून वर्तनातील बिघाडावर उपचार करून मनोविकृत व्यक्तींमध्ये सुधारणा करण्यासाठी मानसशास्त्राची समुपदेशनाचे महत्व विशद करण्यात आलेले आहे. समुपदेशन मानसशास्त्र नावाची शाखा काम करते आहे. प्रस्तुत संशोधनात मानसिक विकृतींवर उपचार करण्यासाठी समुपदेशनाचे महत्व विशद करण्यात आलेले आहे.

## *प्रस्तावना :*

मानवी वर्तन व मानवी मानसिक प्रक्रियांचा अभ्यास मानसशास्त्रात केला जातो. साधारणपणे 1850 नंतर मानसशास्त्र स्वतंत्र शास्त्र म्हणून उदयास आले. मानवी वर्तनाला योग्य दिशेने आकार देण्याचे कार्यमानशास्त्र व मानसशास्त्र करतात. मानवी कल्याणासाठी, विकासासाठी व समाजाच्या विकासासाठी मानसशास्त्र कार्य करते. त्यासाठी मानसशास्त्राच्या विविध शाखा स्वतंत्रपणे कार्य करतात. आज मानाशास्त्राच्या सामाजिक मानसशास्त्र, वैकासिक मानसशास्त्र, बालमानसशास्त्र, समुपदेशन मानसशास्त्र, चिकित्सा मानसशास्त्र, गुन्हेगारीचे मानसशास्त्र, बोधनिक मानसशास्त्र, स्त्री मानसशास्त्र, या व यासारख्या विविध भाखा कार्य करतात याचाच अर्थ मानवाची म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विविध कार्यक्षेत्रात मानसशास्त्र व मानसशास्त्रज्ञ सक्षमपणे कार्य करीत आहेत.

मानवाच्या वर्तनात योग्य दिशेने बदल घडवून आणण्यासाठी मानसशास्त्र कार्य करते. मानवी वर्तनाचे भविष्यकथन करणे, मानवी वर्तनात इष्ट दिशेने परिवर्तन घडवून आणण्याचे व मानवी वर्तनाचे नियंत्रण करण्याचे, सामाजिक समस्या परिहार करण्यासाठी कौशल्य विकास, वैयक्तीक जीवनातील समस्या समजून घेणे व त्या सोडविण्यासाठी व व्यक्ती जीवन आनंदमय करण्यासाठी विविध मानसिक विकृतीचे निदान व त्यावर उपचार करण्याची ध्येये मानसशास्त्राने बाळगली आहेत. खरे तर वर्तन समजणे व त्यात योग्य बदल घडवून आणण्याचे कार्य अत्यंत गुंतागुंतीचे व क्लिष्ट असे आहे. तरही मानसशास्त्र व मानसशास्त्रज्ञ अत्यंत खंबीरपणे हे कार्य यशस्वीरीत्या पूर्ण करतात.

प्रस्तुत संशोधनात मानवी जीवनातील विविध समस्या सोडविण्याचे एक भाग म्हणून मानसिक विकृतींवर उपचार करण्यासाठी मानसशास्त्रीय समुपदेशन प्रक्रियेचे महत्व विशद करण्यात आलेले आहे.

## *मनोविकृती / अपसामान्य वर्तन :*

मानसशास्त्राच्या अनेक ध्येयांपैकी मनोविकृतींवर उपचार करणे हे एक मानसशास्त्राचे प्रमुख ध्येय आहे. मानवी वर्तन गुंतागुंतीचे असते. सर्वसाधारणपणे व्यक्तीचे वर्तन सामान्य असावे म्हणजेच सामाजिक मानदंडाचे पालन करणारे असावे असे मानले जाते. म्हणून सामाजिक मानदंडापासून विचलित झालेले वर्तन म्हणजे मनोविकृत वर्तन असे समजले जाते.

अमेरिकन सायकिॲट्रिक असोसिएशन APA ने डी.एस.एम. डायग्नोस्टिक ॲन्ड स्टॅटिस्टिकल मॅन्युअल ऑफ मेंटल डिसॉर्डर्स 1994 च्या चौथ्या वर्गिकरणात मनोविकृत वर्तनाची व्याख्या दिलेली आहे. त्यांच्या मते, "चिकित्सात्मक दृष्टया महत्वपूर्ण वर्तनात्मक किंवा मानसिक संलक्षण की जो व्यक्तीच्या वर्तमानकालिन व्यथेशी आणि विकलांगतेशी संबंधीत असतात आणि ज्या लक्षणामुळे व्यक्तींची मृत्यूची वेदना, विकलांगता किंवा स्व स्वातंत्र्य नष्ट पावण्याची शक्यता असते त्यास मनोविकृती किंवा अपसामान्यवर्तन असे म्हणतात. त्याचप्रमाणे, प्रस्तुत लक्षणपुंज म्हणजे, एखाद्या घटनेला दिलेली केवळ अपेक्षित आणि सांस्कृतीक दृष्टया मान्य अशी प्रतिक्रिया असता कामा नये.

मानसिक विकृत रूग्णाच्या वर्तनात कमालीचा दोष आढळतो. बोधनिक बिघाड, स्मृती दोष, विभ्रम, संभ्राती, विक्षीप्त वर्तन शैली, असंबंध वागणे बोलणे, आवेगी वर्तन, चिडखोरपणा, चिंता, नैराश्य, निर्णय प्रक्रियेत दोष, विचार क्षमतेत दोष, भाषा दोष, भावना व्यक्त करता न येणे, भावनिक बधीरता, दुःखी–कष्टी–उदासीन स्थिती, विषमायोजन, विध्वंसक वर्तन, रूढी–परंपरांचे उल्लंघन, स्वतःला व इतरांना धोकादायक वर्तन सामाजिक मानदंडांचे उल्लंघन, प्रचंड ताण–तणाव, जैविक क्रियांमध्ये दोष, या व यासारखी अनेक लक्षणे मानसिक विकृत

रूग्णात आढळतात.

मानसिक विकृती का उदभवते ? या संदर्भात भारत व भारताबाहेर अनेक देशात अगदी पुरातन काळापासून शोध घेणे चालू आहेत. मानसिक विकृतीसाठी विविध तज्ज्ञांनी जबाबदार घटक स्पष्ट केलेले आहेत. सर्व साधारणपणे जैविक यंत्रणेत होणारा बिघाड, मानसिक संघर्ष, न्यूनगंड, अपराधी भाव, मानसिक आघात, एकाकीपणा, अतृप्त इच्छा, ताण–तणावाचे व्यवस्थापन करण्यात येणारे अपयश, आकारण चिंता, नापसंती, सततची नकारात्मक शैली, सतत येणारे अपयश, असाहयतेची भावना, निम्नतम स्व–आदरभाव, आतरवैयक्तिक नातेसंबंध निर्मितीमध्ये येणारे अपयश, विकृत कौटुंबिक पार्श्वभुमी या व यासारख्या अनेक घटकांचा प्रभाव म्हणून व्यक्ती मानसिक विकृत बनण्याची शक्यता असते. मानसिक विकृतीवर उपचार म्हणून समुपदेशन प्रक्रिया राबविली जाते.

### समुपदेशनः

'सल्ला देणे' 'उपदेश करणे' असे शब्द आपण वारंवार दैनंदिन व्यवहारात वापरत असतो. मानसशास्त्रात इतर व्यक्तीच्या समस्या सोडविल्या जातात. त्याला समुपदेशन असा सर्वसाधारण शास्त्रीय शब्द वापरला जातो. खरे तर 'समुपदेशन' हा शब्द नवा नाही. अगदी पुरातन काळापासून संकटग्रस्त व्यक्तीला समस्येतून बाहेर काढण्यासाठी समुपदेशन केले आहे. समुपदेशन हे एक शास्त्र आहे म्हणून समुपदेशनाची व्याख्या खालील प्रमाणे सांगता येईल.

कार्ल रॉजर्स 1952 यांच्या मते, "समुपदेशन म्हणजे सुव्यवस्थित संबंधातून समुपदेशकाने सल्लार्थीला त्याची स्वतःची जाणीव करून देणे व स्वतः विषयी माहिती देणे की ज्यामुळे सल्लार्थी त्याची समस्या सोडविण्यास जाणीवपूर्वक प्रयत्न करतो." प्रस्तुत व्याख्येत राजर्स यांनी समुपदेशक व सल्लार्थी यांना महत्व दिले आहे. समुपदेशक व सल्लार्थी यांच्या नातेसंबंधावर समुपदेशनाची यशस्विता अवलंबून असते. रिचार्ड नेल्सन–जोन्स यांनी 2005 मध्ये समुपदेशनाची खालील प्रमाणे व्याख्या सांगितली आहे.

"समुपदेशन ही एक मानसशास्त्रीय प्रक्रिया असून त्याचा सल्लार्थी आणि समुपदेशक या दोघांच्याही मानसिकतेवर परिणाम होतो. तसेच, दोघेही परस्परांच्या मानसिकतेवर परिणात करीत असतात. त्यामुळे सल्लार्थी मध्ये बदल होवून तो स्वतःच्या समस्या स्वतः सोडविण्यास सक्षम होतो."

उपरोक्त व्याख्यात रिचार्ड नेल्सन, जोन्स यांनी सल्लार्थी व्यक्तीच्या मानसिक घटकाला व बदलणाऱ्या जीवनशैलीला अत्यंत महत्व दिले आहे. समुपदेशनाने सल्लार्थी व्यक्तीला स्वतःच स्वतःच्या समस्या सोडविण्यास सक्षम केले जाते.

समुपदेशन प्रक्रियेचा वापर करून रूग्णाच्या ठायी असणाऱ्या नकारात्मक भाव–भावनांचा निचरा केला जातो. त्यामुळे, मानसिक विकृतीवरील उपचारात मानसशास्त्रीय समुपदेशन अत्यंत उपयुक्त ठरते.

मनोविश्लेषण उपचार पध्दती, वर्तनवादी उपचार पध्दती, व्यक्ती–केंद्रीत पध्दती, बोधनिक उपचार पध्दती, समूह उपचार पध्दती, मानवतावादी–अस्तित्ववादी उपचार पध्दती, कौटुंबिक उपचार पध्दती, वैवाहीक उपचार पध्दती, या व यासारख्या मानसशास्त्रातील उपचार पध्दती उपयोगात आणून मनोविकृती व तत्सम समस्यावर उपाय सुचविता येतात.

### मनोविकृती व समुपदेशन संबंध :

मानवी वर्तनात योग्य दिशेने बदल घडवून आणण्याचे कार्य मानसशास्त्र करते. योग्य वर्तनाचे दृढीकरण घडवून आणणे व अयोग्य वर्तन नष्ट करून त्या ठिकाणी योग्य वर्तन आणण्याचे कार्य मानसशास्त्र करते. मानसिक विकृती बऱ्या करण्यासाठी मानसशास्त्रीय समुपदेशन वरदान ठरते. कारण,

1.मनसिक रूग्ण व्यक्तीचा आत्मविश्वास गमावलेला असतो. समुपदेशक सल्लार्थी व्यक्तीला छोटी–छोटी कार्ये करायला भाग पाडून त्यामध्ये यशस्वी करतो. त्यामुळे, सल्लार्थीला कोणतेही कार्य करण्याची उर्मी होवू लागते. त्याची असाहयता कमी होते.

2.मनोविकृत व्यक्ती स्वतःला अपराधी समजतात. त्यांच्यात न्यूनगंड निर्माण झालेला असतो. सल्लागार व्यक्ती सल्लार्थीची समस्या ऐकून घेतो. त्यावेळी त्याच्या बोलण्यातून दिसून येणारा स्वतः विषयी झालेला निम्नतर स्व–आदरभाव कमी करून उच्चतम स्व–आदरभाव निर्माण करतो.

3.मनोविकृत व्यक्ती इतरांवर विश्वास ठेवत नाहीत. ते इतरांबददल साशंक असतात मात्र मानसशास्त्रीय समुपदेशनात सल्लार्थी व्यक्तीचा विश्वास बळावता जातो. कारण, मुळातच समुपदेशन प्रक्रिया यशस्वी होणे हे समुपदेशक व सल्लार्थी यांच्यामधील विश्वासावर अवलंबून असते. समुपदेशन प्रक्रियेत लाभार्थी व्यक्तींचा विश्वास संपादन केला जातो.

4.मानसिक विकृत व्यक्तींमध्ये बोधात्मक बिघाड असतो. त्याच्या मध्ये निर्णय प्रक्रियेत दोष असणे, विचार दोष, निर्णय दोष यामुळे भाषा दोष असतो. संभ्रांती, विक्षीप्त वर्तनशैली, असंबंध वागणे बोलणे, आवेगी वर्तन, चिडखोरपणा, चिंता, नैराश्य, निर्णय प्रक्रियेत दोष, विचार क्षमतेत दोष, भावना व्यक्त करता न येणे, भावनिक बधीरता, दुःखी–कष्टी–उदासीन स्थिती, विषमायोजन, विध्वसंक वर्तन, या व यासारख्या दोषातून मनोविकृतांमध्ये वर्तन दोष येतात. मानसशास्त्रीय समुपदेशनाचा उपयोग करून सल्लार्थी व्यक्तीमध्ये असणारे विविध दोष नष्ट करणे शक्य होते.

5.काही मानसिक विकृती जैविक दोषामधून उदभवलेल्या असतात. त्यामध्ये मेंदू मधील रचनात्मक व कार्यात्मक दोष, रंगसुत्र दोष, चेतापारेशकांचे प्रमाण व्यस्त असणे, अनुवंशिक दोष, अंतःस्त्रवी ग्रंथीच्या कार्यात व स्त्रावामध्ये दोष या व यासारख्या जैविक घटकांच्या दाषातून मनोविकृती येवू शकते. अशा परिस्थितीत औषधोपचार व मानसशास्त्रीय समुपदेशन यांचा उपयोग करून व्यक्तीला मनोविकृतीमधून बाहेर काढता येते.

6.मानसिक विकृत व्यक्तीच्या वर्तनात बिघाड असतो. मनोविकृत व्यक्तीच्या वर्तनात सकारात्मक दिशेने परिणामकारक बदल घडवून आणणे.

7.व्यक्तीच्या व्यक्तिमत्वातील दोष कमी करणे व व्यक्तिमत्व विकास सुयोग्य दिशेने घडविणे.

8.सलमार्थीचा भावनिक कोंडमारा नाहीसा करून भावनांना मोकळी वाट करून देणे.
9.सल्लामार्थीच्या ठायी अनेक विघातक सवयी असतात. रूग्णाच्या घातक सवयी नष्ट करून त्या ठिकाणी विधायक व पोषक सवयींची रूजवणूक करणे.
10.मनोविकृत व्यक्ती आंतरवैयक्तिक नातेसंबंध निर्माण करणे व त्याची जोपासना करण्यात अकार्यक्षमता असते. सल्लार्थीच्या ठिकाणी आंतरवैयक्तीक संबंध निर्माण करण्याची व ते जोपासण्याची वृत्ती समुपदेशनाने निर्माण करता येते.
11.सल्लार्थी व्यक्तीचे स्व–आदर हरविलेला असतो. सल्लार्थी व्यक्तीच्या स्व–आदर व स्व–संकल्पनेचा विकास घडवून आणण्याचे काम समुपदेशक करतो.
12.सल्लार्थी व्यक्तीच्या विविध अपतांची त्याला जाणिव करून देण्याचे कार्य समुपदेशनाने शक्य होते.
प्रस्तुत संशोधनात स्पष्ट केल्याप्रमाणे मानसशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करून मनोविकृत व्यक्तींवर उपचार केले जातात.

### *समारोप :*

प्रस्तुत संशोधनात मानसशास्त्रीय समुपदेशनाची मानसिक विकृतीवरील उपचारात उपयोगिता स्पष्ट केली आहे. सर्व साधारणपणे मानसिक विकृत व्यक्तीमधील वर्तनदोष नष्ट करण्यासाठी मानसशास्त्रीय समुपदेशन सत्राच्या अचूक फेऱ्यांचा अवलंब करणे गरजेचे असते. समुपदेशन प्रक्रिया एक शास्त्र आहे. त्याचा योग्य व प्रशिक्षणाने उपयोग केला तर मानसिक विकृती लवकरात–लवकर बरी होण्यास मदत होते.

### *संदर्भ ग्रंथ :*

1.प्रा. डॉ. चंद्रशेखर देशपांडे, प्रा. डॉ. मेधा कुमठेकर, सविता देशपांडे, डॉ. वसंत देसले, डॉ. पुंडलिक रसाळ, डॉ. वसुधा कुलकर्णी, समुपदेशन : शास्त्रीय व उपयोजन, 2010 उन्मेश प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती.
2.डॉ. मानवी राजहंस, प्रा. अनघा पाटील, डॉ. सुशील सुर्वे : अपसामान्यांचे मानसशास्त्र, 2012 उन्मेश प्रकाशन, पुणे, सुधारित द्वितीय आवृत्ती.
3.डॉ. के.यु घोरमोडे, डॉ. कला घोरमोडेः शैक्षणिक मार्गदर्शन आणि समुपदेशन, 2010 विद्या प्रकाशन, नागपुर.
4.डॉ. सुनिल सोनटक्के, डॉ. उत्तमराव भोसले, प्रा. अनंत कुलकर्णीः सामान्य मानसशास्त्र 2007 अक्षरलणे प्रकाशन सोलापूर, प्रथम आवृत्ती.
5.डॉ. पंडित र. वि., डॉ. कुलकर्णी अ. वि., डॉ. गोरे चं. वि., सामान्य मानसशास्त्र 1999 पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लीशर्स, नागपूर.
6.प्रा. वि. द. तडसरे : सामान्य मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
7.साधना कामत : मानसशास्त्रीय मार्गदर्शन स्वरूप व कार्य पध्दती, 2001 पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
8.प्रा. चुडामन बडगुजर, मनोविकृती मानसशास्त्र, 2001 महालक्ष्मी पुस्तकालय, नाशिक.
9.डॉ. बी. एन. बर्वे : चिकित्सा मानसशास्त्र 2010 विद्या प्रकाशन, नागपूर.
10.डॉ. सविता देशपांडे : मनोविकृतिशास्त्र नरेंद्र प्रकाशन, पुणे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net